स्फूर्तिस्थान



राष्ट्रशाहीर कै. म. ना. नानिवडेकर
(१९०४ ते १९६२)

।। श्रीः ।।

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा पोवाडा (संक्षिप्त)

द्विशताब्दी स्मृति महोत्सवी वर्ष

मूल्य रु. ५/-

॥ श्री: ॥

# पुण्यश्लोक अहिल्याबाई यांचा पोवाडा

धन्य राणी अहिल्या होळकर । राज्यधुरंधर ।
पुण्यशील थोर । स्वधर्मोद्धार तिनं हो केला ॥
आसेतु-हिमाचलभरी । देवतेपरी । क्षेत्रमंदिरी ।
जिचा बोलबाला ॥ जी ऽ जी ॥ ध्रु. ॥

(चाल) औरंगाबाद जिल्ह्याला । चोंढे गांवाला ।
पाटील गाजला । माणकोजी शिंदे भाग्यशाली ॥
त्याचे कुळी अहिल्या जन्मली ।
धनगराची कुळी धन्य केली ॥

(चाल) निष्णात लिहिण्या-पुसण्यात । पोथी-पुराणांत ।
कथा श्रवणात । रंगली बाळी ॥
बाळपणी धर्मश्रद्धेचे बाळकडू प्याली ॥

(चाल) यापरी बाळ लीलांत । वर्षे गेलीं सात ।
आठव्या वर्षांत । अकल्पित लग्न योग येई ॥
अहिल्या राजस्नुषा होई । ऐका नशिबाची नवलाई ॥

(चाल) एक स्वार आला लवलाहीं । माणकोजी पाही ।
सामोरी जाई । विचारी कुशल प्रश्न त्याला ॥
म्हणे आलों सोयरीक शोधाया । अहिल्या वधू पहाया ।
त्याही तुम्ही व्हाया । ठीक शोभला ॥

(चाल) वर्णितो वराची लक्षणं । तरुण गुणवान ।
राजसुत छान । नांव खंडेराव होळकर ज्यांचे ॥
चिरंजीव शूर मल्हारांचे । इंदुरावरी राज्य ज्यांचे ॥
ऐकतां पिता हरकला । मुलीस बोलला ।
कुठं ग ठेवूं तुला । ओवाळूं तरी काय तुझ्यावरनं ॥
चालून आला जांवई नशिबवान ।
करुं म्हणी लगिन कडाक्यानं ॥

(चाल) राज्यनगर इंदुर, गुढ्या तोरणें फुलले ॥
चौघडा, सनई शुभ-नाद नगरभर घुमले ॥
खंडेराव दहा वर्षांचें नवरदेव सजले ॥
वधू खाशी अहिल्याबाई जोडपें जमले ॥

(चाल) लग्नाची घटिका भरे । सकल द्विजवरें ।
सुमंगल स्वरें । शब्द 'सावधान' घोष केला ॥
(शुभ मंगल सावधान)
आली श्वशुर-गृहीं राहायास । राज सदनास ।
इंदुर नगरास । शोभली स्नुषा अहिल्याबाई ॥
जिचे सद्गुण श्वशुर गाई । दावी हरकामीं चतुराई ॥
हेवा करती अमर स्वर्गास । पहावेना त्यांस ।
मृत्युलोकास । सौख्य-संपन्न मानव प्राणी ॥
अहिल्या शल्य खुपे नयनीं । साधला दावा अमरांनीं ॥
पतिराज मद्यपी स्वैर । मालेराव पुत्र ।
तोहि ब्रेडसर । होऊन बेताल देत कष्ट ॥

परी ती कधीं न होई कष्ट । सदा आनंदी संतुष्ट ।।
काळ वेळ नसते व्यसनाला । कुंभेरी किल्ल्याला ।
वेढा दिधलेला । खंडेरावाला नाहीं भान ।।
करुनी मनसोक्त मद्यपान । मोर्चामधीं फिरे विनाकारण ।।

(चाल) दुर्दैव वेळ पातली । आली एक गोळी । मर्मी ती घुसली ।
खंडेराव गतप्राण पडले ।। अहिल्याबाई धायी धायी रडे ।
भूमिला पडे । भंगले चुडे ।। दुःख दाटले ।।

(चाल) पतिराज कुठं चालला । तिनं हंबरडा फोडला ।
सोडुनी मला । धर्मपत्नीला । थांबा, मनी येतें तुम्हांसंगें ।
ऐकता श्वशुर हृदय भंगे । सद्गदित होऊन बोलू लागे ।।

(गद्य) मल्हारराव : 'सूनबाई, सती जाऊं नगोस. मागे फीर, माझा खंडेराव गेला तो गेला. आता तूंच माझा मुलगा आणि मुलगी ! पोरी, मागे फीर. मुलगा गेला तो गेला. तो काही आतां परत येत नाहीं माग फीर. रयतेचा सांभाळ कर !' तिनं सासऱ्याचं ऐकलं आणि सती जाण्याचा बेत फिरवला. पण तिचं दुर्दैव कांहीं तिची पाठ सोडायला तयार नव्हतं)

(चाल) अशी पाहुन बाई संकटीं दुःखी-कष्टी । गंगाधर चंद्रचूड
दिवाण बनला कपटी । बाईच्या द्रव्यावर ठेवितो वक्र दृष्टी ।
राघोबाशीं करतो मसलत । या हो दौडत ।
मारुया हात ।। इथं झटपटीं ।।

मग बाई लागली तयारीला । ऐन वेळेला ।
हुकुम काय केला । बोलवा माझ्या दासी-कुणबिणींना ।।
आल्या सगळ्या पळत भरभर । दोनशेंच्या वर ।
करती वधा मुजरं । बाईच्या चरणां ।।
दिला घोडा बसाया एकेकीला । हातामधीं भाला ।
तसाच आपुणांला । रिसाला महिलांचा थेट सजला ।
बाई निघे आपाडीवर । याही सभोंवार ।
बाईभवती घेर । त्यांनीं धरीला ।।
राघोबा आला दौडत । गर्जना करीत ।
तुकोजी वरतं । रागानं दात-ओठ खात ।।
घातला हात खड्गाला । तोंच थबकला ।
बघुन बायकान्‌ला ।। उचलं ना हात ।।
(अशी राघोबाची फजिती झाली.)
(बाईचा दिनक्रम ऐका.)
दोन वेळा नर्मदा-स्नान । भजन पूजन ।
अन्न संतर्पण । नेम हा अखंड चालविला ।।
जपमाळ दक्षिण करी । बसुन दरबारीं ।
राज्य कारभारीं ।। देह क्षिणविला ।।
(चाल) धन्य देवी तूं अहिल्याबाई ! कलींत केलं अवतरण ।
जनतोद्धारा जन्म घेतला, तुला प्रभातीं करु नमन ।।
तीस वर्षं तुवां तप केलें त्या क्षेत्र महेश्वरीं राहून ।
तप सामर्थ्ये हिंद भूमिवरी पुण्य चाललें वाहून ।।

अंगावरी धवल वसन ।
घोंगडी शुभ्र आसन ।।
कधी त्रुरखा नाहीं घेणं ।
दरबारीं ठाण मांडून ।।
आठ आठ घंटे, खटले ऐकुन, न्याय देतसे निवडून ।
दुष्टां दरारा, गुष्टां आसरा, सौख्य भोगती सकल जन ।।
गुणी जन येती, इनाम नेतीं, वस्त्रे, पालख्या, विपुल धन ।
आला तमासगीर अनंत फंदी, डफ बाजवित खणाखण ।।
खेळासी रंग बहु भरला ।
जन समाज गुंगुनी गेला ।।
ऋतुरयांत कुणी तरी वदला ।
भला ब्राह्मण ! शाहीर असला !!
बाई करे धिक्कार तयाचा, म्हणे विप्र तूं असुनि भला ।
कामुक जन मन रिझवाया कां कनिष्ठ धंदा हा धरिला ?।।
मग फंदी शुद्धिवर आला ।
भर सभ डफ फोडिला ।।
झिडकारुनि बिदागी गेला ।
अट्टल शाहिर अनंत फंदी कीर्तन करुनी गेला तरुन ।
जनतोद्धारा जन्म घेतला, तुला प्रभातीं करु नमन ।।
(चाल) मोडली तीर्थ अन् क्षेत्रें । पाहुनी भग्न मंदिरें ।
बाई गहिंवरे । धांवली कराया उद्धार ।।
द्वारका ते जगन्नाथपुरी । दक्षिण उत्तरी ।

रामेश्वरा परी ॥ बद्रीकेदार ॥

(चाल) काशीपासुन कलकत्त्याला । नवा रस्ता तुवां केला ।
अन्नछत्रं धर्मशाळा । देश भरून ॥
जागोजाग तळी विहिरी । पाणपोया वाटेवरी ।
दुवा देती नर-नारी ॥ जल पिऊन ॥ रं रं रं रं रं ।
यश गाया ठाकले भाट ।
ठायीं ठायीं नदीचे घाट ॥
मंदिरें मनोहर थाट ।
किती कावडी चालती वाट ॥
भागीरथीचे नेती वारी । रामेश्वराचे केदारी ।
अभिषेक तो सांभावरी तुझ्या नावान ॥
सोरटी सोमनाथ उद्धरिला । विश्वेश्वर काशीमधला ।
विष्णुपद गयेमधला । पुन्हां बांधून ॥ रं रं रं रं ॥

(चाल) महादेव शाहीर गर्जून सांगी जगताला ।
इतिहास अहिल्याबाईनं खास उजळीला ।
व्हा धन्य मनोभावानं आठवुन तिजला ।
आसेतु-हिमाचल भरी । देवतेपरी ।
क्षेत्र मंदिरीं ॥ जिचा बोलबाला ॥

✷

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा पोवाडा ( संक्षिप्त )

(ध्वनिमुद्रिकेमध्ये समाविष्ट भाग)

लेखक-गायक : राष्ट्रशाहीर कै. म. ना. नानिवडेकर

द्विशताब्दी स्मृति महोत्सवी वर्षानिमित्त
प्रकाशन दि. २५-८-९५

शाहीर अज्ञानदास स्मृती, बदलापूर गाव रस्ता,
म. पो. कुळगाव, जि. ठाणे
दूरध्वनी : ५९०६८७ STD : ०२५१

---

प्रकाशक : नानिवडेकर शाहिरी संगम, १/१८, गोरेगांवकर चाळ,
गिरगाव, मुंबई - ४०० ००४
(सर्वाधिकार सुरक्षित)

मुद्रक : सुयोग मुद्रण, देवधर वाडी, कुळगाव, जि. ठाणे